# तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या ऑनलाईन परिक्षेबाबत सूचना

**संदर्भ:-** तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाची परिमंडलनिहाय जाहिरात क्र. ०२/२०१६

---------

महापारेषण कंपनीच्या परिमंडल कार्यालयांनी प्रसारित केलेल्या जाहिरात क्र. ०२/२०१६ अन्वये तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदासाठी ऑनलाईन परिक्षा घेण्याबाबत सदर सुचनापत्राद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आता दि. २७.०८.२०१७ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

३. **परीक्षा पत्र (Call Letter)** Download करण्याकरीता, ऑनलाईन पहाणी चाचणी (Mock Test / Demo), लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे (GUIDELINES FOR PERSONS WITH DISABILITIES CANDIDATES USING SCRIBE) व माहिती पुस्तिका (Information Handout) इ. ची लिंक सूचनापत्राच्या शेवटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रवेशपत्र (Call Letter) Download करण्याकरिता शेवटी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक (Link) वर Click करून **"विद्‌यमान वापरकर्ता प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी येथे लॉगिन करा"** या शीर्षकाखाली आपला नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) नमूद करून प्रवेशपत्र Download करावे."

४. ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र (Call Letter) Download करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या संबंधी उमेदवारांनी **022-42040240, 022-42040188, 022-26595228, 022-26595216** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा **callletter_helpdesk@mahatransco.in** या ई-मेल पत्त्यावर आपली समस्या नोंदवावी /पाठवावी. सदर ई-मेल हा दि. २६.०८.२०१७ (१४.०० वाजेपर्यंत) कार्यरत राहील.

५. ऑनलाईन परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता इ. बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या विहित शैक्षणिक अर्हता, वय, प्रमाणपत्रे इत्यादी बाबी धारण करत असल्याची खात्री करावी.

**ऑनलाईन परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सूचना:-**

६. ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) लेखी परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध call letter.

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची **मूळ (Original)** व एक फोटोकॉपी सादर करावी. **ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत प्रत Colour Copy ग्राह्य धरली जाणार नाही.** उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतीचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

*"पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter"s Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with*

*photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार काऊनसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)"*

**3) ओळखपत्र तपासणी:-**

परीक्षा केद्रांवर /परीक्षा सभागृहात उमेदवारांच्या परीक्षा पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**४) महिला उमेदवारांसाठी:-**

महिला उमेदवारांचे परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतीचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/ पतीचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

५) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

६) परीक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परीक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

७. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वत:च्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

- **ऑनलाईन टेस्ट करिताचे प्रवेशपत्र (Admit Card) व ऑनलाईन पाहणी चाचणी (Mock Test/Demo)Download करण्याकरिता येथे Click करावे.**
- **लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे / GUIDELINES FOR PERSONS WITH DISABILITIES CANDIDATES USING SCRIBE**
- **माहिती पुस्तिका (Information Handout) Download करण्याकरिता येथे Click करा**

**ठिकाण: मुंबई** **सही/-**

**दि. १०.०८.२०१७** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

******